महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४०,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ३२.

क्रमांक : एसएफएस-१०२४/प्र.क्र.९७३/एसएम-२ दि. २८ एप्रिल, २०२६

**मान्यता पत्र**

प्रति,

**अध्यक्ष / सचिव,**
**श्री सरस्वती एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई.**

**विषय:-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...
**श्री सरस्वती एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई संचलित श्री चैतन्य टेक्नो स्कुल, न्यू सर्व्हे नं.३६/१/६/२, ३५/क/२ व ३, एम. बारिया व्हाईट सिटी, रॉकस्टार सिनेमाजवळ, अगाशी, विरार (प.), पालघर.**

**संदर्भ:-** इरादा पत्र क्रमांक : एसएफएस-१०२४/प्र.क्र.९७३/एसएम-२, दि.१२.१०.२०२४.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **श्री सरस्वती एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई संचलित श्री चैतन्य टेक्नो स्कुल, न्यू सर्व्हे नं.३६/१/६/२, ३५/क/२ व ३, एम. बारिया व्हाईट सिटी, रॉकस्टार सिनेमाजवळ, अगाशी, विरार (प.), पालघर (प्राथमिक ते माध्यमिक, इ.१ ली ते इ.१० वी, इंग्रजीं माध्यम, सी.बी.एस.ई.)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून **श्री सरस्वती एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई संचलित श्री चैतन्य टेक्नो स्कुल, न्यू सर्व्हे नं.३६/१/६/२, ३५/क/२ व ३, एम. बारिया व्हाईट सिटी, रॉकस्टार सिनेमाजवळ, अगाशी, विरार (प.), पालघर (प्राथमिक ते माध्यमिक, इ.१ ली ते इ.१० वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

**३. अटी व शर्ती :-**

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

Scanned with OKEN Scanner

[illegible]

[illegible] अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा [illegible] किंवा आय.बी. [illegible] इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाचे [illegible] घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित [illegible] अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

१३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दि.१३ डिसेंबर २०२५ अन्वये निर्गमित मार्गदर्शक सूचना व विहित कार्यपध्दतीचे तसेच शासन निर्णय दि.१३ मे २०२५ अन्वये शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात दिलेल्या सर्वसमावेशक सूचनांची शाळेने काटेकोर अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

१४) शासनाद्वारे विनिर्दिष्ट करता येतील अशा इतर कोणत्याही शर्ती.

PRAMOD VITHOBA KADAM

(प्रमोद कदम)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीसाठी -**

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पालघर.
७. निवडनस्ती एसएम-२/प्र.क्र.९७३/२०२४ (**Online App. No :2605231491**).

Scanned with OKEN Scanner

# शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर

**कार्यालय क्र.१७, जिल्हा परिषद इमारत, कोळगाव, बोईसर रोड, पालघर (प.) ४०१४०४**

**ईमेल आयडी :- edu.palghar@gmail.com**


****************************************************************************

जा.क्र.पाजिप/शिक्षण/प्राथ./वशी/३०७ /२०२६-२७/९०((
शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद पालघर
दिनांक :- २७/०७/२०२६

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
श्री सरस्वती एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई संचलित श्री चैतन्य टेक्नो स्कूल,
न्यु सर्व्हे नं.३६/१/६/२, ३५/क/२ व ३, एम. बारीया व्हाईट सिटी, रॉकस्टार सिनेमाजवळ,
आगाशी, विरार (प.), ता. वसई, जि. पालघर.

**विषय :-** स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत..
(इ. १ ली ते ८ वी इंग्रजी माध्यम सी.बी.एस.ई.)

**संदर्भ :-** १. आपलेकडील शाळा मान्यता प्रस्ताव दि. १६/०७/२०२६.
२. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील इरादा पत्र क्र. एसएफएस-१०२४/प्र.क्र.९७३/एसएम-२ दि.१२/१०/२०२४. NO.२६०५२३१४९१
३. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील मान्यता पत्र क्र. एसएफएस -१०२४/प्र.क्र.९७३/एसएम-२ दि.२८/०४/२०२६.
४. उपशिक्षणाधिकारी (मुख्यालय) यांचेकडील शाळा तपासणी अहवाल व शिफारस.

उपरोक्त संदर्मिय विषयान्वये मान्यता देण्यात येते की, आपण या कार्यालयास सादर केलेल्या प्रस्तावातील कागदपत्रांनुसार तसेच महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी विनियम अधिनियम १९७७ आणि महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम १९८१ नुसार तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार सादर केलेल्या अहवाल शिफारशीनुसार व मान्यतेसाठी अटी व शर्ती पुढील प्रमाणे.

१. प्रथम मान्यता खाजगी प्राथमिक शाळा तपासणी अहवाल
२. शासनाकडील परवानगी प्रत.
३. संस्था नोंदणी प्रत.
४. संस्थेच्या घटनेची प्रत.
५. संस्थेमार्फत शाळा सुरू करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही याबाबत संस्था चालकाचे हमीपत्र.
६. संस्थेने शाळेसोबत अ.क्र.१ ते १५ मुद्यांबाबत संस्था चालकाचे हमी पत्र.
७. शाळेने शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे मा.शा.सं.व.म.खा.शा.स.(सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१, तसेच विनियम अधिनियम बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिनियम २००९ मधील तरतुदीचे पालन करणार असल्याबाबत हमीपत्र.
८. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम २०११ दिनांक२१/०३/२०१४ मधील अटी कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक असल्याचे हमीपत्र.
९. शासन निर्णय क्र.एसएसएन/२१०३/(५०/०३)माशि-२दि.२७/०५/२००३ मधील अटी व शर्तीचे पालन करण्यात येईल. याबाबत हमीपत्र.
१०. पालक शिक्षक संघ स्थापन केले असल्याबाबत यादी व शासन निर्णय दि.२४/०८/२०१० मधील अटी व शर्तीचे पालन करण्यात येईल याबाबत हमीपत्र.
११. शाळा सुरू करण्याकरीता शासनाकडे भरणा केलेल्या चलनाची प्रत आहे.
१२. अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी शाळा सुरू केली आहे असे प्रमाणपत्र.
१३. शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची वर्गनिहाय माहिती.
१४. शाळेची इमारत व जागा मालकीची/भाडे तत्वावर व्यवस्थापनाच्या नावे नोंदणीकृत दुय्यम निबंधकाकडील नोंदणीकृत सातबारा /भाडेपट्टा करार आहे.

## शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर

**कार्यालय क्र.१७, जिल्हा परिषद इमारत, कोळगाव, बोईसर रोड, पालघर (प.) ४०१४०४**

**ईमेल आयडी :- edu.palghar@gmail.com**


१५. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी माहिती.

१६. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये विनिर्दिष्ट केलेली मानके व प्रमाणके पूर्ण करीत असल्याबाबत हमीपत्र(बंधपत्र).

१७. भौतीक सुविधा(क्रिडांगण,संगणक कक्ष, वर्गखोल्या,शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ, खेळाचे मैदान, वर्गखोल्यांची संख्या, कार्यालय/मुख्याध्यापकाची खोली, मुलांसाठी/मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, रॅम्प, कुंपन,स्वतंत्र अभिप्राय व छायाचित्रासह).

१८. अग्निशामक यंत्राबाबत पुरावा.

१९. शाळेची इमारत पुरेसी व शैक्षणिकदृष्ट्या योग्य असून दिनांक-०३/११/२००९ च्या शासन निर्णय नॅशनल कोड २००५ नुसार असल्याचे प्रमाणपत्रमान्यता मिळाल्यापासून सहा महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

२०. आपल्या शाळेस प्रथम मान्यता ही आपण सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे देण्यात येत आहे. आपण सादर केलेल्या माहिती खोटी आढळून आल्यास किंवा भविष्यात काही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था/संस्थाचालक/शाळा जबाबदार असेल तसेच दिलेली प्रथम मान्यता रद्द करण्यात येईल.

वरील अटी व शर्तीच्या व संदर्भ क्र. २ ते ४ च्या अधिन राहून श्री सरस्वती एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई संचलित श्री चैतन्य टेक्नो स्कूल, न्यु सर्व्हे नं.३६/१/६/२, ३५/क/२ व ३, एम. बारीया व्हाईट सिटी, रॉकस्टार सिनेमाजवळ, आगाशी, विरार (प.), ता. वसई, जि. पालघर या शाळेस सन-२०२६-२७ पासून प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा **म्हणून स्वयंअर्थसहाय्यित** तत्वावर इ. १ ली ते ८ वी इंग्रजी माध्यम सी.बी.एस.ई. (प्राथमिक व उच्च प्राथमिक) प्रथम मान्यता देणेत येत आहे.

(सोनाली मातेकर)
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद पालघर**

**प्रत:-** १) मा. शिक्षण उपसंचालक मुंबई विभाग मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वसई, ता.वसई, जि.पालघर यांना माहितीसाठी.

# नमुना दोन

ई-मेल :-Edu.palghar@gmail.com फॅक्स :-

जावक क्र. :- जा.क्र/पाजिप/शिक्षण/प्राथ/आस्था/ ६०२ /२०२६-२७/५४१०
शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद पालघर
दिनांक:- २१ / ०७ /२०२६

जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय:- शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, पालघर
(जिल्हा/राज्य यांचे नाव:-) जिल्हा पालघर (महाराष्ट्र)

व्यवस्थापक :- श्री सरस्वती एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई संचलित श्री चैतन्य टेक्नो स्कूल,
न्यु सर्व्हे नं.३६/१/६/२, ३५/क/२ व ३, एम. बारीया व्हाईट सिटी,
रॉकस्टार सिनेमाजवळ, आगाशी, विरार (प.), ता. वसई, जि. पालघर

**विषय :-** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत...

आपल्या दि. २९/०६/२०२६ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे.

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.) दिनांक २१/०७/२०२६ पासून दिनांक ३१/०३/२०२९ पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इ. १ ली ते ८ वी इंग्रजी माध्यम सी.बी.एस.ई. (प्राथमिक ते उच्च प्राथमिक) श्री सरस्वती एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई संचलित श्री चैतन्य टेक्नो स्कूल, न्यु सर्व्हे नं.३६/१/६/२, ३५/क/२ व ३, एम. बारीया व्हाईट सिटी, रॉकस्टार सिनेमाजवळ, आगाशी, विरार (प.), ता. वसई, जि. पालघर या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे :-**

- मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
- बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.
- शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
- परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
- संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
- कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी., धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
- शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
- शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
- शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.
  मागील तपासणी वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-
  - शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- ७६०९.१६ चौ.मि.

- एकुण बांधकाम क्षेत्र :- ४०४७.८३ चौ.मि.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ : २५०० चौ.मि.
- वर्गखोल्यांची संख्या :- २२
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली :- २
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. :- मुलासाठी :- १०
  मुलीसाठी :- १०
- पिण्याच्या पाण्याची सुविधा:- नळ
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर :- १
- अध्यापन अध्ययन साहित्य/ खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता :- आहे.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.:- आहे.

- मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
- शाळेची इमारत किंवा इतर बांधकात किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
- शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
- शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
- शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठवण्यात यावी.
- तुमच्या शाळेला मिळोलल्या संकेतांक **PALGHAR/VASAI/ENG/SF/२६/२६** असा आहे, हया या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.
- शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
- संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.
- जोडपत्र "तीन" नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.
- आपल्या शाळेस दिलेली पुनर्मान्यता ही आपण सादर केलेल्या प्रस्तावानुसार देण्यात येत आहे. प्रस्तावात सादर केलेली कागदपत्रे खोटी आढळून आल्यास आपणास दिलेली पुनर्मान्यता रदद करण्यात येईल व आपणा विरुध्द चुकीची माहिती दिल्याबद्दल फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

(सोनाली मातेकर)
**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद पालघर**